भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेमध्ये सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक : सावियो-२०२१/प्र.क्र.१९/अजाक,**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ जुलै, २०२१

**संदर्भ** :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. दवसू-२०१५/ प्र.क्र.३४७/ अजाक, मंत्रालय, मुंबई -३२, दि ०९/०३/२०१८.

**प्रस्तावना-**

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या नागरी व ग्रामीण भागातील वस्ती/गावांना विकासपुरेशा निधी अभावी होऊ शकला नाही अशा भागातील लोकप्रतिनिधींनी (केवळ विद्यमान खासदार व आमदार) सुचविलेल्या कामांना शासन स्तरावर मान्यता देऊन या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामे, अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निश्चीत करुन "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना" अशी राज्यस्तर योजना शासन निर्णय दिनांक ०९ मार्च, २०१८ अन्वये सन २०१८-१९ या वर्षापासून राबविण्यात येत आहे.

सदर योजना लोकप्रतिनिधींच्या मागणीप्रमाणे ग्रामविकास, अल्पसंख्याक आणि नगरविकास विभागाच्या धर्तीवर शासन स्तरावर थेट निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची राज्यस्तर योजना आहे. सदर शासन निर्णयात योजनेमध्ये घ्यावयाच्या कामांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तथापि, विद्यमान खासदार व आमदार यांच्याकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या हक्कासाठी कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींशी निगडीत स्थळे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्टया महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे, त्यांची स्मारके उभारणे व अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा सांस्कृतिक विकास घडवून आणणे (उदा. वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र, विपश्यना केंद्र, इत्यादी) याद्दष्टीने अनेक प्रस्ताव प्राप्त होत आहेत. सदर बाब विचारात घेऊन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेच्या उद्दीष्टात वाढ करणे आवश्यक असल्यामुळे वर नमूद कामांचे प्रकल्प/योजना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेमधून पूर्ण करण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दीपत्रक :-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेच्या दिनांक ०९ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयात नमूद योजनेमध्ये घ्यावयाच्या कामांमध्ये वाढ करुन त्यामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींशी निगडीत स्थळे तसेच, सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्टया महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे, त्यांची स्मारके उभारणे व अनुसूचित

Scanned with OKEN Scanner

जाती व नवबौध्द घटकांचा सांस्कृतिक विकास घडवून आणणे (उदा. वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र, विपश्यना केंद्र, प्रशिक्षण केंद्र) याद्दष्टीने नव्याने समावेश करण्यात येत आहे. ही कामे शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जागेवर घेता येतील.

२. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत प्रतिकाम रुपये १ कोटी किंवा त्यापेक्षा अधिक किंमत असलेले परंतु रुपये १५ कोटीपेक्षा कमी किंमतीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या मार्फत शासनास सादर करावेत.

३. स्थानिक स्वराज्य संस्था प्रकल्प शासनास सादर करतेवेळी सदर प्रकल्प पुर्णत्वास आल्यानंतर त्याची संपूर्ण देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी स्विकारण्याविषयी हमीपत्र देतील. त्याचप्रकारे अनुसूचित जाती उपयोजनेच्या या निधीतून उभारलेल्या वास्तूचा जास्तीत जास्त उपयोग हा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना होईल, या विषयीचे हमीपत्र सुध्दा स्थानिक स्वराज्य संस्थांनी देणे बंधनकारक राहील. शासकीय जागेवर उभारलेल्या प्रकल्पाची मालकी ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची राहील. प्रकल्पाची उभारणी सुरु करण्यासाठी शासकीय जमीन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या नावे करणे आवश्यक राहील.

४. शासकीय जमिनीवर उभारण्यात आलेल्या प्रकल्पाच्या देखभाल व दुरूस्ती ची जबाबदारी प्रकल्पाच्या लगतच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वीकारावी लागेल. शासकीय जमिनीवरील अशा प्रकल्पाची देखभाल व दुरूस्ती करण्याची पूर्ण हमी सदर स्थानिक स्वराज्य संस्थेने घेतल्याशिवाय प्रकल्प मंजूर केला जाणार नाही.

५. लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे निवडण्याचे सर्व अधिकार हे शासनास राहतील. शासनास पाठवावयाचे प्रस्ताव, बांधकाम आराखडा, अंदाज पत्रक तांत्रिक मान्यतेसह ज्या जिल्ह्यातील प्रस्ताव असतील त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत शासनास सादर करावेत. आयुक्त, समाज कल्याण यांनी सदर प्रकल्पाची संपूर्ण छाननी करुन सदर प्रकल्प योजनेच्या उद्दिष्टाप्रमाणे योग्य आहे याची खात्री करुन शासनास सादर करावेत. सदर प्रस्तावांना शासन प्रशासकीय मान्यता देईल.

६. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेच्या शासन निर्णय, दिनांक ०९ मार्च,२०१८मध्ये सदर योजनेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. सदर शासन निर्णयात खालीलप्रमाणे नवीन अटी व शर्ती समाविष्ट करण्यात येत आहेत :-

१. सदर योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पाचा लाभ अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील व्यक्तींनाच होईल याची खात्री संबंधीत जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी करावी.

Scanned with OKEN Scanner

२. सदर प्रकल्प हा सार्वजनिक बांधकाम विभागाने/संबंधीत यंत्रणेने निश्चीत केलेल्या मंजुरी आदेशात नमूद विहीत कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

३. सदर योजनेंतर्गत केलेला प्रकल्प/बांधकाम यावर "सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून मिळालेल्या अनुदानातून" असा नामफलक लावण्यात यावा.

४. सदर योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामांची देखभाल व दुरुस्ती संबंधित क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडून करण्यात यावी. याबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून लेखी हमीपत्र घेण्यात यावे.

५. सदर कामाचे पर्यवेक्षण सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी दर ३ महिन्यांनी करुन आयुक्त, समाज कल्याण यांचे मार्फत शासनास अहवाल सादर करावा. सहाय्यक आयुक्त यांना पर्यवेक्षण करण्यासाठी गरज असल्यास तांत्रिक सल्लागार नेमण्याची मुभा देण्यात येत आहे. त्यासाठी लागणारा व इतर खर्च प्रकल्पाच्या (योजनेच्या) रक्कमेच्या ०.५% रक्कम राखीव ठेऊन त्यातून करावा.

६. सदर योजनेंतर्गत कामांना अनुदान देण्यामागे अनुसूचित जाती अथवा धर्मांतरीत बौध्द या घटकांचा विकास करणे तसेच, या घटकांचा सामाजिक व बौध्दिक स्तर उंचावणे हा उद्देश आहे. त्यामुळे या योजनेंतर्गत कामांना मंजुरी देतांना या बाबीचा विचार करण्यात यावा. तसेच, सदर कामे शासनाच्या अनुदानातून करण्यात येणार असल्यामुळे त्यांचा वाणिज्यिक वापर करता येणार नाही.

७. या शिवाय उपरोक्त संदर्भाधीन दि.०९/०३/२०१८ च्या शासन निर्णयात नमूद बाबींमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही.

८. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२१०७२९१२४३०९७६२२ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DINESH RAMCHANDRA DINGLE

(दि. रा. डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२. सर्व मा. संसद सदस्य आणि विधानपरिषद/ विधानसभा सदस्य,
३. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

Scanned with OKEN Scanner